**रयत शिक्षण संस्थेचे भैरवनाथ माध्यमिक ,तांत्रिक व कौशल कौशल्य विद्यालय अवसरी खुर्द मध्ये कर्मवीर जयंती सोहळा संपन्न –**

रयत शिक्षण संस्थेचे भैरवनाथ माध्यमिक ,तांत्रिक व कौशल कौशल्य विद्यालय अवसरी खुर्द मध्ये पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३६ वा जयंती सोहळा दि.२४/०९/२०२३ रोजी संपन्न झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री,व संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा. नामदार दिलीपरावजी वळसे पाटील साहेब होते तसेच प्रमुख पाहुणे संस्थेचे चेअरमन आदरणीय मा.श्री.चंद्रकांत दळवी साहेब हे होते या कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे चेअरमन मा.श्री.चंद्रकांत दळवी साहेब यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यालयातील अटल टिकरिंग लॅब,जि.प.पुणे यांच्याकडून रु.सात लाख अनुदानातून मिळालेल्या व्यायाम शाळेचे उदघाटन करण्यात आले.या प्रसंगी आदरणीय चेअरमन श्री.चंद्रकांत दळवी साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यालयात सुरू असलेले व्यावसायिक शिक्षण व सर्व सुविधांची पूर्तता असतांना सुध्दा दिवसेंदिवस विद्यालयाची घटत चाललेली विद्यार्थी संख्या ही चिंतनीय बाब आहे अशी खंत व्यक्त करताना सर्व शिक्षकांना,पालकांनी व ग्रामस्थांनी विद्यार्थी वाढीसाठी साथ द्यावी असे आव्हान केले.तसेच सर्वच विद्यार्थ्यांनी त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विद्यालयात राबवित असलेल्या उपक्रमात १०० % सहभाग घ्यावा असेही सांगितले.
या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.नामदार दिलीपरावजी वळसे पाटील साहेब यांनी मा.चेअरमन श्री. चंद्रकांत दळवी साहेब यांनी सस्थेच्या चेअरमन पदाची धुरा हाती घेतल्या नंतर बदलेल्या संस्थेच्या धोरणानुसार घेतलेल्या निर्णयाचे कौतुक केले तसेच विद्यालयाची विद्यार्थी संख्या वाढीसाठी शिक्षकाबरोबरच पालकांची महत्वाची जबाबदारी आहे असे सांगितले .
या वेळी मा.श्री.मंगेश शिंदे साहेब (खाजगी सचिव ,मा.मंत्री,शालेय शिक्षण व मराठी भाषा ) संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य श्री.राजाराम बाणखेले ,श्री.बाळासाहेब बेंडे पाटील ,श्री.उदय शिवाजीराव पाटील ,सरपंच ग्रामस्थ आजी माजी विद्यार्थी उपस्थित होते .कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री.जाधव डी.डी.यांनी केले तर सूत्रसंचालन सौ.निकिता थोरात व श्री.जगदीश गुरव यांनी केले .









